IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 11, March 2025
Impact Factor: 7.67

# ललित: मराठी लोकनाट्य

ईश्वर ढोले
वाणिज्य विभाग प्रमुख
दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जी.सी.यु.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज गोरेगांव रायगड, महाराष्ट्र

भारतात व महाराष्ट्रात लोकनाट्याची खूप मोठी परंपरा आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात या लोककला पहावयास मिळतात. महाराष्ट्रातील लोककलांचे स्वरूप प्रत्येक भूभागानुसार वेगवेगळे आहे. या लोककलांमध्ये कीर्तन, गोंधळ, दशावतार, भारुड, इत्यादी वेगवेगळे लोककला प्रकार आहेत. हे लोककला प्रकार संस्कृती संवर्धनाचे काम करीत असतात. आज मात्र जागतिकीकरणाच्या फेऱ्यात या लोककला लोप पावत चालल्या आहेत. खरंतर या लोककलांचे जतन संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. या लोककला सादर करणारे लोककलावंत आज उपेक्षित आहेत. परंतु ते या कलेवर जीवापाड प्रेम करतात म्हणून या लोककला आज काही अंशी जिवंत आहेत. त्यापैकीच ललित ही एक लोककला आहे.

**ललित: स्वरूप** -

ललित म्हणजे सोंग आणणे. महाराष्ट्रामध्ये सण, उत्सवाच्या निमित्ताने जे वेगवेगळे कार्यक्रम होतात त्यामध्ये शेवटच्या दिवशी देवदेवतांची किंवा लौकिक स्वरूपातील सोंगे आणले जातात. त्याचे स्वरूप नाटकासारखे असते. ललित म्हणजेच सोंग आणणे असे असले तरी महाराष्ट्रात हा शब्द अनेक अर्थाने वापरला जातो. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ललिताची खूप मोठी जुनी परंपरा आहे. परंतु काळाच्या ओघात ही परंपरा लोप पावत चाललेली आहे. तसेच तिचे स्वरूपही बदलत चालले आहे.

**ललित एक नाट्य** -

महाराष्ट्र **शब्दकोशात** ललिताचा अर्थ पुढील प्रमाणे दिला आहे - 'नवरात्र इत्यादी उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सोंग आणून खेळ करणे' यावरून एक गोष्ट स्पष्ट आहे की ललितामध्ये सोंगाला विशेष महत्त्व असल्याचे दिसते.

**डॉ. आनंदकुमार स्वामी यांच्या मते** –

'ललित' हा शब्द लीला या शब्दावरून बनला असावा. त्यांच्या म्हणण्यात काही तथ्य आहे. कारण महाराष्ट्रात तसेच महाराष्ट्र बाहेर कृष्ण लिलेचे अनेक अभंग आहेत. महाराष्ट्राच्या महानुभाव आणि वारकरी संप्रदायामध्ये कृष्ण भक्तीला विशेष महत्त्व आहे. महानुभावीयांच्या पहिल्या चरित्र ग्रंथाचा विचार केला तर या ग्रंथाचे नाव 'लीळाचरित्र' असे आहे. आणि या ग्रंथातून चक्रधरांचे चरित्र आलेले आहे. पंचकृष्णामध्ये श्री चक्रधर स्वामींचा समावेश होतो. या त्यांच्या लीळा म्हणजे आठवणींचे हे चरित्र आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 11, March 2025
Impact Factor: 7.67

**संत भानुदासांनी आपल्या अभंगामध्ये ललिताचा उल्लेख केला आहे तो पुढील प्रमाणे-**

*'जाला त्रिभुवनी उल्हास, ललित गाय भानुदास'*

संत भानुदासांच्या या उल्लेखावरून ललित म्हणजे शेवटचे मंगल गाणे असा अर्थ निघतो. संत तुकारामांच्या अभंग गाथेत १०- १२ अभंग ललितावर लिहिलेले आहेत. परंतु वारकरी संप्रदायाचा विचार करत असताना संत ज्ञानेश्वर ज्यांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. याच कालखंडात त्यांना साथ देणारे संत नामदेव हे कीर्तन परंपरेचे प्रवर्तक आहेत. यांच्या अभंगातून मात्र ललिताचा कुठेही उल्लेख येत नाही. परंतु त्यांच्या अभंगातून 'काला' हा शब्द वारंवार येतो. काला हा महाराष्ट्रातील एक वैष्णव नृत्य उत्सव आहे. तसेच विविध खाद्यपदार्थ दही, दूध, लोणी हे सगळे एकत्र करून कालविणे म्हणजे काला. वारकरी संप्रदायात ही परंपरा आहे. तसेच गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा ही आहे. म्हणूनच ललित आणि कीर्तन यांचा खूप जवळचा संबंध आहे.

*न. शे. पोहनेरकर* ललिताचे स्वरूप स्पष्ट करताना म्हणतात, 'व्यक्तीने एखाद्याचे सोंग घेऊन केलेली भूमिका म्हणजे ललित.'

*कृ . बा. मराठे* यांच्या मते, 'पूर्वी ललित ज्यावेळी रूढ होते. त्यावेळी ते कीर्तनाचा अंतिम भाग असे त्या भागात मुख्य कीर्तन ज्या आख्यानावर असे त्या आख्यान प्रसंगांची सोंग ललितात साजरे होत असे'.

वरील मतांचा विचार करता पूर्वी ललित आणि कीर्तन यांचा खूप जवळचा संबंध होता. हे यावरून स्पष्ट होते.

*डॉ. रा. चिं.* ढेरे यांच्या मते, 'आज आपल्याला केव्हा तरी जे ललित पाहावयास मिळते ते म्हणजे भारुडाचे अभिनित स्वरूप होय. या कार्यक्रमात संतांची भारुडे प्रत्यक्ष सोंग घेऊन मंचावर सादर केली जातात. तो कार्यक्रम आपण आज ललित म्हणून ओळखतो'.

ललिता संबंधीची वरील विविध मते विचारात घेता ललित म्हणजे एखाद्या सण, उत्सव, यात्रा, हरिनाम, सप्ताह अशा विविध धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने या कार्यक्रमाची सांगता करताना जी विविध प्रकारची देव देवतांचे किंवा लौकिक स्वरूपातील सोंगे सादर केली जातात. त्यांना थोडक्यात ललित असे म्हणतात. ही परंपरा महाराष्ट्रात आजही वेगवेगळ्या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळते.

**ललिताचे प्रकार -**

महाराष्ट्रातील भूभागानुसार ललिताचे एकूण चार प्रकार आपल्याला पाहायला मिळतात ती पुढील प्रमाणे -

१) काल्याचे ललित

२) कीर्तनाचे ललित

३) नाम सप्ताहाचे ललित

४) लोकोत्सवाचे ललित

**ललिताचे सादरीकरण -**

उदा. 'शंकर पार्वतीचा फेरा' या ललितात शंकर पार्वती ही दोन सोंगे सजवलेली असतात. पार्वतीचे सोंग पुरुषानेच घेतलेले असते. ज्या संचाने हे सॉंग सादर केलेले असते त्या संचातील सूत्रधार प्रथम शंकर-पार्वतीच्या संचाचा थोडक्यात परिचय

करून देतो. आणि निवेदन करतो, की हे शंकर-पार्वती जगाचा फेरफटका माराव्यास निघाले आहेत. त्याचे निवेदन संपले की प्रत्यक्ष शंकर- पार्वतीच्या फेऱ्यास सुरुवात होते हा प्रसंग असा-

पार्वती: नाथ, आज आपल्याला कोण्या देशी फेरा मारावयाचा आहे?

शंकर: प्रिये, तू मला विचारतेस? अगं, या जगाची तू मालकिण. माझी ही कारभारीन. सगळा कारभार तुझ्याच हाती आहे. तेव्हा तू सांगावेस आणि मी ऐकावे.

सांग माझ्या कानात,
हिंडू आपण वनात,

पार्वती: नको बाई पर्वतावर आणि वनात, राहून कंटाळा आला बघा. आज आपण भारत देशावरून फेरी मारू.

शंकर: भारत देशावरून तर, भारत देशावरून. चल. अग, पण आपला गणपती कुठे आहे त्यालाही घेऊ सोबत.

पार्वती: त्याला नग, सोबत. झोपलाय पाळण्यात. उगाच रडू लागला तर त्याला पाजावं लागतं. म्या त्याला आफुची गोळी दिली. आपण परत येईपर्यंत तो काही उठणार नाही. शाळेतल्या मास्तरणी नाही का ताण्या लेकराला ठेवून साळत जातात. चला लवकर आता....

आणि असे म्हणून शंकर-पार्वती मोकळ्या जागेत फिरण्याचा अभिनय करतात. मधून-मधून पार्वती बोट दाखवून हे काय ते काय आहे? असे विचारते आणि शंकर तिच्या प्रश्नांना उत्तरे देतात. या प्रसंगाच्या संवादातून सामाजिकता अधिक असते. मधून मधून मिश्किल विनोदही केला जातो. आणि मग एखाद्या गरीब ब्राह्मणास मदत करून शंकर-पार्वतीचा फेरा संपतो. फेरा संपल्यानंतर शंकर-पार्वतीची आरती केली जाते.

तर थोडक्यात वरील प्रमाणे लळिताचे सादरीकरण होते. आजही ग्रामीण भागामध्ये कीर्तन संपल्यानंतर त्या कथाभागावर ही सोंग आणली जातात. त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारचे उत्सव यात्रा मधून वेगवेगळ्या प्रकारचे लळित सादर केले जाते.

**निष्कर्ष –**

ललित हा एक जुना पारंपारिक लोककला प्रकार आहे. लळीत या लोककला प्रकारातून समाजप्रबोधनाचे खूप चांगले काम केले जाते. हा कलाप्रकार काळाच्या ओघात लोप पावत चालला आहे. त्याचे जतन संवर्धन होणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

१) लोकधर्मी नाट्याची जडणघडण -शरद व्यवहारे.
२) लोकनागर रंगभूमी -डॉ. तारा भवाळकर.
३) लोकरंगभूमी (परंपरा, स्वरूप आणि भवितव्य)- प्रभाकर मांडे.
४) मराठी लोकनाट्य ललित -डॉ.बाळकृष्ण लळीत.
५) मराठी रंगभूमीचा पूर्वरंग - कृ. बा. मराठे.
६) भारतीय रंगभूमीच्या शोधात - रां. चिं. ढेरे.